नि.दि.दावा क्र.४६/२०२३
पवन वि. निहालसिंग
**निशाणी क्रं. २२.**

**<u>वादीतर्फे सा.क्र.०१ पवन मानसिंग जोनवाल यांचा उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ४ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.चव्हाण यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

०१. मी दावा दाखल केला तेव्हा कलर फोटो वकीलाला दिले नव्हते. मंदाबाई जोनवाल हिने वादमिळकत गब्रु गिरजाराम जोनवाल यांच्याकडून खरेदी केली. हे म्हणणे खरे आहे की, मंदाबाई जोनवालने ज्या चतूर्सीमेतील जमीन खरेदी केली तीच जमीन मी खरेदी केली. मंदाबाई जोनवालने चुकीची चतूर्सीमा दाखवून जमीन खरेदी केली नाही असे माझे म्हणणे नाही. मी जमीन खरेदी करण्यापूर्वी जमीनीचे कागदपत्र पाहिले होते. मी मंदाबाई जोनवाल यांचे खरेदीखत पाहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, जुन २०२३ मध्ये माझे व प्रतिवादींची भेट झाली नाही. मी ०३ जुन २०२३ रोजीच्या घटनेबाबत या दाव्याव्यतिरिक्त कुठेही कारवाई केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींसोबत माझ्या वडीलांचा पूर्वीपासून वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींचा वाद माझ्यासोबत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाद हा चुकीची जमीनीची चतूर्सीमा खरेदी केल्याबाबतची आहे. चतूर्सीमा दुरुस्ती करण्याबाबत मी कोठेही अर्ज केला नाही.

**०२.** मला दावा दाखल करण्याच्या कारणांची तारीख आठवत नाही. मी वकीलांना दाव्यात घडलेल्या कारणांची तारीख सांगितली नाही. हे म्हणणे खरे नाही की,दावा दाखल करण्यासाठी मला कारण नाही. हे म्हणणे खरे नाही की, जुन्या वादातून प्रतिवादींविरुध्द खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकत माझ्या ताब्यात असून मी वहिती करतो व प्रतिवादी त्यांची जमीन वहिती करतात. माझी जमीन आज रोजी प्रतिवादी वहिती करीत आहेत. मी जमीन खरेदी केल्यापासून प्रतिवादींच्या ताब्यात जमीन आहे. माझ्या जमीनीचा ताबा मिळावा म्हणून दावा दाखल केला. याव्यतिरीक्त माझी कोणतीही मागणी नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीला त्रास देण्यासाठी चुकीचा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी अडथळा आणलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील कथने चुकीची आहेत.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2025.12.11 17:38:45 +0530

**(जी.डी. गुरनुले)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,खुलताबाद.

दिनांक ११.१२.२०२५